महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षककार्यालय, सातारा
(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनीक्रमांक- ०२१६२-२३३९२३ फॅक्सक्रमांक - ०२१६२-२३०२३२
वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट दिनांक २५/११/२०२२

## (स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांचीकारवाई)
## (पोलीस अभिलेखावरील गुन्हेगाराकडून ६५,०००/- रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्टल जप्त)

श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी सातारा जिल्हयात बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची माहिती प्राप्त करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक अरुण देवकर, स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना दिलेल्या असून श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली सातारा जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध शस्त्र कारवाई बाबत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

पोलीस अभिलेखावरील आरोपी नामे सुयोग दिलीप कदम रा.मालगाव ता.जि.सातारा याचेजवळ देशी बनावटीचे पिस्टल असून तो सध्या सातारा ते लोणंद जाणारे रोडवरील पाटखळ गावचे हद्दीतील माऊली लॉजचे समोर थांबलेला आहे अशी गोपनिय माहिती दि.२४/११/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना प्राप्त झाली. त्या अनुशंगाने त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे यांचे अधिपत्याखाली एक पथक तयार करुन त्यांना नमुद इसमास ताब्यात घेवून पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे तपास पथकाने सातारा ते लोणंद जाणारे रोडवरील पाटखळ गावचे हद्दीतील माऊली लॉजचे समोर जावून पोलीस अभिलेखावरील आरोपी नामे सुयोग दिलीप कदम रा.मालगाव ता.जि.सातारा यास ताब्यात घेतले असता त्याचे अंगझडतीमध्ये ६५,०००/- रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल मिळून आल्याने ते ताब्यात घेवून त्याचे विरुध्द सातारा तालूका पोलीस ठाणे गु.र.नं.५१०/२०२२ आर्म ॲक्ट ३, २५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, पोलीस अंमलदार उत्तम दबडे, अतिष घाडगे, विजय कांबळे, संजय शिर्के, शरद बेबले, संतोष सपकाळ, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, मुनीर मुल्ला, अमित सपकाळ, निलेश काटकर, विक्रम पिसाळ, मोहन पवार, प्रविण पवार, वैभव सावंत, विशाल पवार, केतन शिंदे, रोहित निकम, सचिन ससाणे, पृथ्वीराज जाधव यांनी सदरची कारवाई केली आहे. कारवाई मधील सर्व अधिकारी व अंमलदार यांचे श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

पोलीस अधीक्षक सातारा, करीता

प्रति-

सर्व संपादक,

-------------------